# केसीई सोसायटीचे एस. एस. मणियार विधी महाविद्यालय, जळगाव

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव २०२२-२३ उपक्रम

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | दिनांक | समन्वयक |
|---|---|---|---|
| 1. | आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस व क्रांति दिन | ०९/०८/२०२२ सकाळी ९ वाजता | प्रा. जी. व्ही. धुमाळे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) |
| 2. | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निबंध स्पर्धा | १३/०८/२०२२ | प्रा. जी. व्ही. धुमाळे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) |
| 3. | "भारताचा राष्ट्रीय ध्वज तिरंगा - ऐतिहासिक ओळख" विषयावर वेबिनार | १३/०८/२०२२ दु. ०४ वाजता | प्रा. जी. व्ही. धुमाळे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) |
| 4. | अमृत दौड | १४/०८/२०२२ सकाळी ६:३० वाजता | डॉ. विजेता सिंग, प्रा. जी. व्ही. धुमाळे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) |
| 5. | सांस्कृतिक कार्यक्रम | १५/०८/२०२२ सकाळी ९:०० वाजता | डॉ. अंजली बोंदर (विद्यार्थी विकास अधिकारी) |
| 6. | तिरंगा रॅली | १५/०८/२०२२ सकाळी १०:०० वाजता | डॉ. विजेता सिंग, प्रा. जी. व्ही. धुमाळे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) |
| 7. | सामूहिक राष्ट्रगान | १७/०८/२०२२ सकाळी ११:०० वाजता | प्रा. जी. व्ही. धुमाळे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) |

S. S. MANIYAR LAW COLLEGE JALGAON 425001

डॉ. बी. युवाकुमार रेड्डी
प्राचार्य
PRINCIPAL
S.S.Maniyar Law College,Jalgaon

दि. १८/०८/२०२२

प्रति,

संचालक,

राष्ट्रीय सेवा योजना,

कबचौं उत्तर महाराष्ट्र विध्यापीठ, जळगाव

विषय: स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रम अहवाल

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून महाविध्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले त्याचा सविस्तर अहवाल आपणास सादर करत आहोत तरी स्वीकार करून सहकार्य करावे ही विनंती.

प्रा. जी. व्ही. धुमाळे
रासेयो कार्यक्रम अधिकारी

S.S. MANIYAR LAW COLLEGE JALGAON 425001

डॉ. बी. युवकुमार रेड्डी
प्राचार्य
PRINCIPAL
S.S.Maniyar Law College,Jalgaon

## आंतर्राष्ट्रीय आदिवासी दिवस आणि ऑगस्ट क्रांति दिन

दि. ९ ऑगस्ट रोजी आंतर्राष्ट्रीय आदिवासी दिवस आणि ऑगस्ट क्रांति दिनानिमित महाविध्यालयात सामूहिक राष्ट्रगान घेण्यात आले. यावेळी महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, डॉ. अंजली बोंदर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. रेड्डी यांनी आंतर्राष्ट्रीय आदिवासी दिवस आणि ऑगस्ट क्रांति दिनाच्या शुभेच्या दिल्या व आदिवासींच्या मानवी हक्क संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच डॉ. सिंग, प्रा. ज्योति भोळे यांनीही मार्गदर्शन केले. त्याचबरोबर विध्यार्थी प्रणील चौधरी, कल्पना शिंदे यानीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. धुमाळे यांनी केले व उपस्थितांचे आभार मानले.



S.S. MANIYAR LAW COLLEGE JALGAON 425001

## निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि विध्यापीठ नाम विस्तार दिनानिमित्त दि. १३ ऑगस्ट रोजी **निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन** करण्यात आले. "स्वातंत्र्याची ७५ वर्ष", "कवयित्रि बहिणाबाई चौधरी", आणि "राष्ट्रीय ध्वज तिरंगा" हे निबंध स्पर्धेसाठी देण्यात आले होते. उत्स्फूर्तपणे मोठ्या प्रमाणात विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

निबंधाचे परीक्षण डॉ. अंजली बोंदर आणि डॉ. विजेता सिंग यांनी केले. प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी यांनी स्पर्धेतील सर्व सहभागी स्पर्धकांचे कौतुक केले व शुभेच्या दिल्या. कार्यक्रम आधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे यांनी आभार मानले.

## "भारताचा राष्ट्रीय ध्वज तिरंगा - ऐतिहासिक ओळख" विषयावर वेबिनार

त्यानंतर दुपारी ४ वाजता "भारताचा राष्ट्रीय ध्वज तिरंगा - ऐतिहासिक ओळख" विषयावर वेबिनार घेण्यात आला. वेबिनारला प्रमुख वक्ते म्हणून जी.डी. सावंत कला, वाणिज्य, विज्ञान महाविध्यालय, नासिक येथील प्रा. सुनील कनकटे हे लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी यांनी भूषविले. वेबिनारला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम आधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, डॉ. अंजली बोंदर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. कनकटे यांनी राष्ट्र ध्वजाची संकल्पना त्यातील रंग आणि त्याचा आशय याचे विश्लेषण केले, तसेच राष्ट्र ध्वजाच्या अनुषंगाने संविधानिक सभेत झालेली चर्चा, आणि वाटचाल संदर्भात ऐतिहासिक पटाची सविस्तर मांडणी केली. त्यानंतर राष्ट्रध्वज आणि राष्ट्राची प्रतीके संदर्भात नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय या संदर्भात मार्गदर्शन केले. तत्पूर्वी कार्यक्रम आधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे यांनी प्रस्ताविकपर मांडणी करून उपस्थितांचे स्वागत केले. प्राचार्य डॉ. रेड्डी यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले. प्रा. धुमाळे यांनी आभार मानले.

S. MANIYAR LAW COLLEGE JALGAON 425001



**अमृत दौड मध्ये महाविध्यलयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक सहभाग**

दि. १४ ऑगस्ट रोजी जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या वतीने आयोजित अमृत दौड मध्ये महाविध्यलयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक सहभाग नोंदवला. काव्यरत्नावली चौक येथून अमृत दौड ची सुरवात झाली. यामध्ये जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, उद्योगपती अशोक जैन सह महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, कार्यक्रम आधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, डॉ. विजेता सिंग, डॉ. अंजली बोंदर आणि विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.





**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित सांस्कृतिक कार्यक्रम**

दि. १५ ऑगस्ट रोजी महाविध्यालयात सर्वप्रथम प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांच्या हस्ते ध्वजा रोहण करुण राष्ट्रगीत घेण्यात आले. त्यानंतर विध्यपीठाच्या नामविस्तार दिनाच्या निमित्ताने

S. S. MANIYAR LAW COLLEGE JALGAON 425001

कवयित्रि बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. तदनंतर महाविध्यालयाच्या विध्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. काही विध्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. तसेच विध्यार्थ्यांनी स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षाच्या वाटचालीचा गौरवशाली इतिहास संदर्भात मनोगत व्यक्त केले. त्यानंतर डॉ. अंजली बोंदर यांनी उपस्थितांचे आभार मानले.





## रासेयो एककाचा तिरंगा रॅली मध्ये सहभाग

दि. १५ ऑगस्ट रोजी सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यानंतर महाविध्यालयातून तिरंगा रॅली काढून जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय येथून आयोजित तिरंगा रॅली मध्ये सहभाग नोंदवला. या रॅली मध्ये महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, डॉ. विजेता सिंग, डॉ. अंजली बोंदर आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे व रासेयो चे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले.




S. S. MANIYAR LAW COLLEGE
JALGAON
425001

 



## राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सामूहिक राष्ट्रगान

दि. 17 ऑगस्ट रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सामूहिक राष्ट्रगान घेण्यात आले. यावेळीही महाविध्यालयचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम आधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, डॉ. अंजली बोंदर उपस्थित होते. त्यानंतर सभा विसर्जित करण्यात आली.

 

प्रा. जी. व्ही. धुमाळे
रासेयो कार्यक्रम अधिकारी

S.S. MANIYAR LAW COLLEGE
JALGAON
425001

डॉ. बी. युवाकुमार रेड्डी
प्राचार्य
PRINCIPAL
S.S.Maniyar Law College,Jalgaon

दि. ०५/०७/२०२२

प्रती,

मा. संचालक,

राष्ट्रीय सेवा योजना,

कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,

जळगाव.

विषय: शाहू महाराज जयंती आणि समता दिंडी भेटिचा अहवाल.

महोदय,

एस. एस. मणियार विधी महाविद्यालयात दि. २७ जून २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी भूषविले. यावेळी मंचावर डॉ. डी. आर. क्षीरसागर, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे हे होते. कार्यक्रमास डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंघ, डॉ. अंजली बोंदर उपस्थित होते.

यावेळी डॉ. रेड्डी यांनी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व त्यांच्या सामाजिक न्याय संदर्भात मार्गदर्शन केले. डॉ. क्षीरसागर यांनी शाहू महाराजांनी विविध शैक्षणिक संस्था सुरु केल्या व विद्यार्थ्यांसाठी वसतिग्रह सुरू केले म्हणून कुणबी, दलित समुहाणा शिक्षणाची संधि मिळाल्याचे अधोरेखित केले. त्यानंतर प्रा. धुमाळे यांनी शाहू महाराजांनी जातीअंतासाठी राबवलेल्या उपक्रमाची माहिती देऊन त्यांचे वैज्ञानीक दृष्टिकोण स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो स्वयंसेवक विपश्यना सपकाळे हिने केले तर डॉ. विजेता सिंघ यांनी आभार मानले.

प्रा. जी. व्ही. धुमाळे
रासेयो कार्यक्रम अधिकारी

S.S. MANIYAR LAW COLLEGE JALGAON 425001

डॉ. बी. युवकुमार रेड्डी
प्राचार्य
PRINCIPAL
S.S.Maniyar Law College,Jalgaon





राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती निमित प्रतिमेस अभिवादन करताना प्रा. डॉ. बी. युवकुमार रेड्डी, रासेयो कार्यक्रम अधिकारी जी. व्ही. धुमाळे, डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंध, डॉ. अंजली बोंदर व स्वयंसेवक

दि. ०५/०७/२०२२

प्रती,
मा. संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव.

विषय: समता दिंडी भेट आणि व्यसन मुक्ति सप्ताह अहवाल.

महोदय,

एस. एस. मणियार विधी महाविद्यालयात दि. ०५ जुलै २०२२ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग प्रायोजित समता दिंडी चे आगमन झाले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने समता दिंडीचे स्वागत करण्यात आले. विनोद ढगे यांचा सत्कार प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सहकारी सचिन महाजन, दुर्गेश आंबेकर, पाटील यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, डॉ. डी. आर. क्षीरसागर, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे हे होते. कार्यक्रमास डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंघ, डॉ. अंजली बोंदर उपस्थित होते.

यावेळी विनोद ढगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून व्यसनाधीनतेचे गंभीर परिणाम आणि त्यातून होणारी कुटुंबाची वाताहत मांडून व्यसनमुक्ती चा संदेश दिला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज यांच्या पोवाड्याच्या माध्यमातून सामाजिक समतेचा संदेश दिला. प्राचार्य डॉ. रेड्डी यांनीही सामाजिक न्याय संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी विनोद ढगे यांनी सर्व उपस्थितांना व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. धुमाळे यांनी केले व मान्यवरांचे आभार मानले.

प्रा. जी. व्ही. धुमाळे
रासेयो कार्यक्रम अधिकारी

S.S. MANIYAR LAW COLLEGE
JALGAON
425001

डॉ. बी. युवकुमार रेड्डी
प्राचार्य
PRINCIPAL
S.S.Maniyar Law College,Jalgaon





समता दिंडी निमित्त कार्यक्रमात पथनाट्य सादर करताना विनोद ढगे आणि त्यांचे सहकारी सचिन महाजन, दुर्गेश अंबेकर





समता दिंडीला हिरवी झेंडी दाखवताना प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, डॉ. डी. आर. क्षीरसागर, विनोद ढगे आणि त्यांचे सहकारी व डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, डॉ. अंजली बोंदर व स्वंयसेवक





व्यसन मुक्ति सप्ताहानिमित्त शपथ देताना विनोद ढगे आणि त्यांचे सहकारी यावेळी प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, डॉ. अंजली बोंदर व स्वंयसेवक

दि. १०/१०/२०२३

## महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान

महात्मा गांधी जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, गणेश कॉलोनी, जळगाव आणि महाविद्यालय परिसर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अभियानात प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, डॉ. अंजली बोंदर, प्रा. ज्योती भोळे आणि रासेयो स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला. उद्यानाच्या आतील व महाविद्यालय परिसराची स्वच्छता व प्लास्टिक संकलन करण्यात आले.
















दि. १९/१०/२०२३

स्वच्छता अभियान आणि प्लास्टिक संकलन अभियान

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ रासेयो विभाग आणि विविध महाविद्यालयाचे रासेयो एककांच्या वतीने स्वच्छता अभियान व प्लास्टिक संकलन अभियान राबविण्यात आले. याअंतर्गत जी. एस. मैदान ते रेल्वे स्थानक परिसरा दरम्यान हे अभियान राबविण्यात आले. यावेळी कबचौउमवि रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विभागीय समन्वयक डॉ. नितीन बडगुजर, महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे आणि इतर महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून अभियान राबवला.









दि. २८/१२/२०२२

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने एस.एस. मणियार विधी महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने एस.एस. मणियार विधी महाविद्यालयात रेडक्राॅस रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिर व विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने वैद्यकीय तपासणी घेण्यात आले. यावेळी वैद्यकीय तपासणी अधिकारी डॉ. सूयोग चौधरी, डॉ.रोहन पाटील, रेडक्रॉस सोसायटीचे डॉ. शामकांत सोनवणे, प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, डॉ. डी.आर. क्षीरसागर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, डॉ. अंजली बोंदर, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, प्रा. बी. एस. पाटील, प्रा. ज्योती भोळे, प्रा. स्वाती लोखंडे, प्रा. ललीता सपकाळे उपस्थित होते.
यावेळी रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून व आरोग्य हीच खरी धनसंपदा असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थीनींचे उंची, रक्तदाब, वजन, नाडीचे ठोके ई. तपासण्या करण्यात आल्या.

तत्पूर्वी प्राचार्य डॉ. रेड्डी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना व आलेल्या मान्यवरांचे स्वागत पुष्पसुमनांनी केले. विद्यार्थी व शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केले. रेडक्राॅसचे तंत्रज्ञ सहकारी सुनिता वाघ, रुपाली बडगुजर, किरण बाविस्कर, अनवर खान यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व शेवटी मान्यवरांचे आभार प्रा. धुमाळे यांनी मानले.

फोटो ओळ: - राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने एस.एस. मणियार विधी महाविद्यालयात रक्तदान प्रसंगी प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, डॉ. डी.आर. क्षीरसागर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, डॉ. अंजली बोंदर, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, प्रा. बी. एस. पाटील, प्रा. ज्योती भोळे, प्रा. स्वाती लोखंडे, प्रा. ललीता सपकाळे.

 

दि. ०८/०३/२०२३

### एस एस मणियार विधी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

एस एस मणियार विधी महाविद्यालय आणि अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय रासेयोच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांच्या हक्काचे संरक्षण समस्या आणि उपाय या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख वक्त्या म्हणून महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयश्री नेमाडे हे लाभले. यावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, सत्कारमूर्ती वैशाली झाल्टे उपस्थित होते. कार्यक्रमास डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. रेखा पाहुजा, कार्यक्रमाधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, डॉ. योगेश महाजन, डॉ. अंजली बोंदर, डॉ. शेख, प्रा. बी. एस. पाटील, प्रा. ललिता सपकाळे, प्रा. स्वाती लोखंडे, प्रा. ज्योती भोळे उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कोरोना काळात झोपडपट्टी परिसरातील मुलांच्या शिक्षणासाठी अभेद्या फाउंडेशनच्या माध्यमातून शिक्षणघर उपक्रम राबवणाऱ्या वैशाली झाल्टे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. नेमाडे यांनी शासनाच्या महिला धोरणांचा आढावा घेत आजही लिंगभाव आधारित श्रमाचा बोजा महिलावर कसा दुहेरी होतो ते स्पष्ट केले. त्याचबरोबर आधुनिक उच्चशिक्षित महिलाही आपल्या साथीदारासोबत किमान तडजोडी सही तयार नसल्या मुळे संघर्ष वाढत असल्याचे अधोरेखित केले. त्यानंतर डॉ. रेड्डी यांनी पुरुषसत्ताक मूल्यवस्थेचे वाहक म्हणून महिला सुद्धा कशा शोषकाची भूमिका पार पाडतात ते स्पष्ट केले

त्याचबरोबर महिलाविषयक कायदेशीर तरतुदीचा आढावा घेत काही तरतुदी आजही कशा पुरुषसत्ताक मूल्यवस्थेचे वाहक आहेत ते अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. अंजली बोंदर यांनी केले. तर कार्यक्रमाधिकारी प्रा धुमाळे यांनी सत्कारार्थी वैशाली झाल्टे यांचा परिचय व पुरस्काराची प्रास्ताविक भूमिका स्पष्ट केली आणि शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.










कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. बी. युवाकुमार रेड्डी
प्राचार्य